# भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिका, भिवंडी

## दी.अ.यो.राष्ट्रीय नागरी उपजिविका अभियान विभाग

### //जाहीर प्रकटन// प्रथम मुदत वाढ

### नागरी पथविक्रेत्यांच्या अधिकाराचे रक्षण करणे आणि पथविक्रेत्यांच्या कृत्यांचे नियमन २०१४ च्या अनुषंगाने शहर फेरीवाला समिती सदस्य नियुक्ती बाबत

भिवंडी निजामपुर शहर महानगरपालिकेच्या क्षेत्रातील फेरीवाल्यांच्या संदर्भात राष्ट्रीय फेरीवाला धोरण २००९ लागू करण्याच्या दृष्टीने आवश्यक ती कार्यवाही/उपाययोजना करणेबाबत महाराष्ट्र शासन,नगर विकास विभाग,मंत्रालय,मुंबई-३२ यांनी पारीत केलेल्या शासन निर्णय क्र.राफेधो-२०१३/प्र.क्र.३९/नवि-३४ दि. ३१ ऑक्टोंबर २०१३ चे आदेशान्वये तसेच मा.उच्च न्यायालय,मुंबई यांनी दिलेल्या दि.०३/११/२०१७ रोजी दिलेल्या आदेशान्वये "नगर पथविक्रेता समिती" गठीत करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे.खालील नमुद प्रवर्गातील नियुक्तीकरीता इच्छुक प्रतिनिधी कडुन अर्ज मागविण्यात येत आहेत.

| अ.क्र | प्रवर्ग | तपशील | पद |
|---|---|---|---|
| १ | २ | भिवंडी निजामपुर शहरातील विविध फेरीवाला संघटनाच्या प्रतिनिधींची शहर फेरीवाला समितीच्या एकुण सदस्य संख्येपैकी किमान ४० टक्के म्हणजेच १२ इतके प्रतिनिधी (प्रती संघटना १ सदस्य) | सदस्य |
| २ | ३ | भिवंडी निजामपुर शहरातील विविध रेसिडेन्ट वेलफेअर असोसिएशन,समुदाय आधारित संघटना (कम्युनिटीबेस ऑर्गनायझेशन) या संघटनाच्या प्रतिनिधींची शहर फेरीवाला समितीच्या एकुण सदस्य संख्येपैकी किमान २० टक्के म्हणजे ६ इतके प्रतिनिधी | सदस्य |
| ३ | ४ | भिवंडी निजामपुर शहरातील विविध इतर नागरी (सिव्हिल) संस्था/संघटना,जशा व्यावसायिक समुहातील प्रतिनिधी जसे वकील,डॉक्टर,नगररचनाकार,आर्किटेक्ट इ.व्यापार व वाणिज्य समुहाचे प्रतिनिधी,शेडयुल्ड बॅंकेचे प्रतिनिधी अथवा महत्वाचे नागरीक इत्यादीचे प्रतिनिधीमधून शहर फेरीवाला समितीच्या एकुण सदस्य संख्येपैकी किमान २० टक्के म्हणजेच ६ इतके प्रतिनिधी | सदस्य |

वरील संघटना/संघ यांची नियुक्ती खालील निकषाच्या आधारावर सर्व सदस्यांचे नामनिर्देशन अर्ज स्विकारण्यात येतील.

१) संघटनेची किंवा संघाची सक्षम प्राधिकरणाकडे नोंदणी केलेल्याचे तिन वर्षापुर्वीचे प्रमाणपत्र

२) संघटना किंवा संघ मागील तीन वर्षाचे (सन २०१४-१५,२०१५-१६,२०१६-१७) सक्षम प्राधिकरणकडून तयार करण्यात आलेले लेखापरिक्षण अहवाल सादर करील.

३) संघटना किंवा संघ यांना,त्यांनी सक्षम प्राधिकरणाकडे नोंदणी केल्याच्या त्यांच्या प्रवर्गामधील कामाचा किमान तीन वर्षाचा अनुभव असावा.

४) संघटना किंवा संघ त्या त्या वेळी अंमलात असलेल्या कोणत्याही कायदयान्वये सिध्ददोषी असणार नाहीत.

५) संघटनेस किंवा संघास स्थानिक प्राधिकरणाने काळया यादीत टाकलेले नसावे.

तरी वर नमुद केलेल्या भिवंडी निजामपुर शहरातील अशा संघ/संघटना यांचे प्रतिनिधी यांना नागरपथ विक्रेता समितीवर वरिल नमुद निकषा प्रमाणे सदस्य म्हणुन नियुक्ती करावयाची आहे. सदर शहर फेरीवाला समितीवर नियुक्ती करावयाच्या फेरीवाला संघटना, रेसिडेन्ट वेलफेअर असोसिएशन व इतर नागरी संस्था संघटना या प्रवर्गातील एकुण सदस्य संख्येपैकी किमान १/३ सदस्य (एकुण १०) या महिला सदस्य असतील. आपला अर्ज,दी.अ.यो.राष्ट्रीय नागरी उपजिविका अभियान विभाग, ६वा माळा, भिवंडी नि. शहर महानगरपालिका मुख्य इमारत,जुना एस.स्टी.स्टॅंड,कापअळी,भिवंडी,जि.ठाणे येथे नमुद निकषा प्रमाणे कागदपत्रांसह दि.२३/०३/२०१८ रोजी दु.४.०० वाजे पर्यंत जमा करावे.

उप-आयुक्त (दि.अ.यो.रा.ना.उ.अ.)
भिवंडी नि.शहर महानगरपालिका,भिवंडी